Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
email- stores@unishivaji.ac.in

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,महाराष्ट्र**
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, भांडार विभाग ०२३१-२६०९०८५/८६

शिवाजी वि/भांडार/एसआयके/१५६ दिनांक :- १७/९/२०२५

## कोटेशन नोटीस

प्रति,
संबंधित पुरवठाधारक

महोदय,

विद्यापीठाच्या वर्धापनदिनांच्या समारंभामध्ये मान्यवरांना चांदीची गौरवचिन्हे दिली जाणार असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे. दरपत्रक बंद लिफाफ्यातून नोंदणीकृत (GST प्रमाणपत्र असलेल्या) पुरवठाधारकांनी कार्यालयात **मा. वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर** यांचे नावे दिनांक २५/९/२५ रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत कार्यालयात पोहोचतील अशा रितीने समक्ष अथवा पोस्टाने पाठवावीत. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. विद्यापीठास आवश्यक चांदीच्या 400 ग्रॅम वजनाच्या गौरवचिन्हे विद्यापीठास नमुन्याप्रमाणे करुन द्यावयाची आहेत. त्याचे तांत्रिक वर्णन, नगसंख्या व अटी शर्ती खालीलप्रमाणे –

## अटी व शर्ती

| तपशिल | नग संख्या |
|---|---|
| 1. विद्यापीठ बोधचिन्ह असलेले 10"x6" आकाराचे 400 ग्रॅम वजनाचे 95% टंच चांदीचे सागवाणी बेसमेंट व ॲक्रेलिक बॉक्ससह अंडाकृति गौरवचिन्हे | 06 नग |

2.विद्यापीठ गौरवचिन्हांचा पुरवठा कार्यालयीन नमुन्याप्रमाणे व त्यावरील रंगसंगती प्रमाणे करावयाचा आहे.

3.नमुन्याप्रमाणे नसलेले नग पुन्हा वेळेत तयार करुन द्यावे लागतील व त्यासाठी वेगळा आकार दिला जाणार नाही.

4.गौरवचिन्हांचे प्लेटिंग रंगकाम सुबक व आकर्षक करावयाचे असून गौरव चिन्हांचे मागील लाकडी बेस आकर्षक व उत्तम प्रतीच्या सागवानी लाकडाचा असावा. गौरवचिन्ह ॲक्रेलिक बॉक्स सहीत द्यावयाचे आहे.

5.ऑर्डर पोटी ॲडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही.

6.ज्या पुरवठादाराचे दर मान्य केले आहेत त्यांना एकूण खरेदी रकमेच्या 5%रक्कम सुरक्षा ठेव म्हणून कार्यालयात रोखीने भरावी लागेल.

7.बिल दोन प्रतीत **मा. वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांचे नावे ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीटसह द्यावे लागेल.

8.कार्यालयात मान्य केलेल्या चांदीच्या गौरवचिन्हांच्या वजनाच्या बाबतीत धर्मकाट्याच्या पावत्या सोबत द्याव्या लागतील.

9. दरपत्रके स्वीकृत झाली आहेत असे पुरवठाधारकास कळविल्यानंतर दरपत्रकामंधील अटी व शर्तीचा अंतर्भाव असलेल्या हमीपत्राचा मसुदा विद्यापीठाकडून पाठविला जाईल व ते हमी पत्र आवश्यक त्या मंजूर दिनांक व सही शिक्क्यासह 05 दिवसांत विद्यापीठाकडे परत करावयाचा आहे. विहीत मुदतीत करारनामा करून न दिल्यास बयाणा रक्कम जप्त करून दुस–या निविदाधारकाकडून पुरवठयाची प्रकिया सुरू केली जाईल.

10. विद्यापीठाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार पुरवठाधारकाने गौरव चिन्हांचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

11. दर सर्व कर समावेशक (GST सह) विद्यापीठ पोहोच असावेत.

12. दरपत्रकासोबत लिफाफा क. 1 मध्ये खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. व लिफाफा क. 2 मध्ये दर भरणे आवश्यक

1. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, 2. मागील तीन वर्षाच्या आयकर विवरण पत्रे संस्था नोंदणी प्रमाणपत्र
4. पुरवठाधारकांची यादी

13. देयकाची 100 टक्के रक्कम सर्व पुरवठा झाल्यानंतर गौरवचिन्हे आवश्यकतेप्रमाणे असलेबाबत खात्री करून आदा केली जाईल.

14 पुरवठाधारकाला आदा केल्या जाणा–या देयकांच्या रकमेमधून प्रचलित दरानुसार (शासनास देय असलेली) कराची रक्कम वजा केली जाईल.

15. पुरवठधारकाकडून हमीपत्रात नमूंद केलेल्या गौरवचिन्हांचा पुरवठा वेळेत न झाल्यास विद्यापीठास करारातील हक्क अबाधीत ठेवून नुकसान भरपाई (दंडाची रक्कम) खालीलप्रमाणे वसुल करता येईल.

16. उशिरा पुरवठा केलेल्या गौरवचिन्हांच्या मालाच्या किंमतीवर 0.5 टक्के प्रति आठवडयाप्रमाणे दंड आकारणी केली जाईल व जास्तीत 5 टक्के दंड आकाराला जाईल.

उपकुलसचिव